Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 12 No - 2 Issue - 39 Jan-April 2024 ISSN-2347-9639

IIJIF Impact Factor 2.283

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

संपादक
प्राचार्य डॉ. प्रमोद पवार

प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. लियाकत खान । डॉ. विठ्ठल दहिफळे
प्राचार्य डॉ. विलास आघाव । डॉ. संजय वाघ । डॉ. संभाजी पाटील । डॉ. वकार शेख

अथर्व पब्लिकेशन्स्

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद

# विचारमंथन

National Research Journal of Political Science and Public Administration
(A Peer Reviewed Journal)
E-mail : vicharmanthanjournal@gmail.com Visit Us : vicharmanthanjournal.org

♦ Editor ♦

Prin. Dr. Pramod Pawar (Mob : 9423582073)

Prin. Dr. Manohar Patil
Prof. Dr. Liaqat Khan
Prof. Dr. Ravindra Bhanage
Prin. Dr. Vilas Aaghav
Prin. Dr. Bal Kamble
Dr. Vitthal Dahiphale
Dr. Sandip Nerkar
Dr. Viquar Shaikh

♦ President ♦
Dr. Sanjay Wagh
Email : smwagh2009@gmail.com
Mob : 9221884384

♦ Secretary ♦
Dr. Sambhaji Patil
Email : sspatil2011@gmail.com
Mob : 9860988591

♦ Guided by ♦
Prin. Dr. P. D. Deore
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13
Mob : 9423980457

E-mail : vicharmanthanjournal@gmail.com
Visit Us : vicharmanthanjournal.org
Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985



Scanned with OKEN Scanner

३२. २०१४ नंतर भारत – श्रीलंका संबंध व त्याचे परिणाम एक अभ्यास. .................... १३३
– *प्रा.कस्तुरे योगेश प्रकाश, डॉ.लावंड पंडित महादेव*

३३. भारत – एक सॉफ्ट पॉवर, उदय व वाटचाल .................... १३६
– *ब्रम्हानंद अमृतराव शिंदे, प्रा.डॉ. राजेंद्र दिलीप आगवाने*

३४. राजकीय संभाषण आणि प्रचाराला आकार देण्यासाठी समाज माध्यमाची भूमिका.......... १४०
– *डॉ. शरद सांबारे, प्रा.विजयकुमार पंधरे*

३५. सहभागी लोकशाहीचा समकालीन पैस आणि गांधी तत्त्वज्ञानातील लोकशाही.............. १४८
– *संदीप तुंडूरवार, प्रोफेसर डॉ. राहुल बावगे*

३६. भारतीय राज्याच्या राजकारणातील राज्यपालांची
भूमिका : घटनात्मक तरतूद आणि उत्तीवाद .................... १५४
– *प्रा डॉ मुंगे सिद्धार्थ, डॉ.सत्यपाल कांबळे*

३७. भारत व जागतिक लोकशाही .................... १५९
– *शरद मनसुख, डॉ. ज्योत्सना सोनखासकर (प्राचार्या)*

३८. लोकतंत्र में परिवर्तन (लोकतंत्र की अवधारणा, अर्थ, स्वरुप एवं विकास).................. १६३
– *सौ. प्रतिभा विश्वनाथ पांचाळ, डॉ. ए. एच. कदम*

३९. भारत सरकार के डायस्पोरा नीति का उद्भव और विकास
(स्वतंत्रता पूर्व से स्वतंत्रता के पश्चात) .................... १६८
– *अश्विनी कृष्णाराव राऊत*

४०. Mapping the Intersection of Democratic Indices and Socio-Economic
Realities in Contemporary India.................... 174
– *Qureshi Parveen Naser, Dr. Shrikant Deshmukh*

४१. Unemployment and Waste Management : Fixing
The Two Issues Simultaneously.................... 179
- *Dr. Vilas Aba Gaikwad, Tanmayee G. Padmane*

४२. Indian Democracy.................... 182
- *Vijay Maroti Magare*

४३. Russia Ukraine Crisis and New Global Political Dimensions.................... 184
- *Rabit Kumar Ugale, Himanshi Kayan, Dorjee P. Dinglow*

४४. Transition in Democracy : One Nation One Election.................... 189
- *Mr. Sandip Bhaguji Bhabad, Prof. Dr. Sanjay Ankush Kale*

४५. Soft Power Assets of India.................... 193
- *Prof. Pradip Jankar*

४६. India's Political And Economic Development : Opportunities and Challenges...... 198
- *Mr. Yashwant Khade, Ms. Shraddha Bhandari*



Scanned with OKEN Scanner

# भारत – एक सॉफ्ट पॉवर, उदय व वाटचाल

**ब्रम्हानंद अमृतराव शिंदे**
संशोधक विद्यार्थी,
के.जे.सोमय्या कॉलेज कोपरगाव,जि. अहमदनगर

**प्रा.डॉ. राजेंद्र दिलीप आगवाने**
संशोधन मार्गदर्शक,
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे
वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय,सिन्नर ,नाशिक.

**गोषवारा** (Abstract)

हा शोध निबंध आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये सॉफ्ट पॉवर म्हणजे काय,भारत धोरणात्मकदृष्ट्या सॉफ्ट पॉवर चा कसा वापर करतो याचे परीक्षण करतो. तत्त्वज्ञान, आर्थिक प्रगती,तंत्रज्ञानातील विकास, कला या बाबीभारताचीजागतिक स्तरावर चांगली प्रतिमा निर्माण व्हायला कसे उपयोगी आहेते अभ्यासतो. सांस्कृतिक, योग आणि शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारी यासारख्या कार्यक्रमांद्वारे भारत एक सॉफ्ट पॉवर म्हणून कसा उदयास येत आहे व भारताचा राजनैतिक प्रभाव कसा वाढतो आहे हे पाहतो. हा अभ्यास भारताच्या सॉफ्ट पॉवरच्या विविध पैलूंचे स्पष्टीकरण देतो, जागतिक संबंध आणि आंतरराष्ट्रीय धारणांवर त्याचा प्रभाव दाखवतो. तसेच जगातील इतर देश आणि भारत यांची सॉफ्ट पॉवर बाबतची धोरणे , त्यांबाबतची प्रगती यांचा तुलनात्मक अभ्यास करतो. भारताच्या सॉफ्ट पॉवर बाबतची आव्हाने, भविष्यातील संभावना यांचा मागोवा ही या शोध निबंधात घेण्यात आला आहे .

**प्रस्तावना**

आंतरराष्ट्रीय राजकारणात सॉफ्ट पॉवर म्हणजे,सक्ती करण्याऐवजी सोबत घेण्याची क्षमताहोय, जीकठोर शक्तीच्या (हार्डपॉवर) विरुद्ध असते. यात अपील आणि आकर्षणाद्वारे इतरांच्या पसंतींना आकार देणे समाविष्ट आहे.जोसेफ नाय यांनी सॉफ्ट पॉवर ही संकल्पना लोकप्रिय केली. त्यांच्या मते जेव्हा एखादा देश त्याला हवे आहे ते इतर देशांना सुद्धा हवेसे बनवतो त्यास सहकारी किंवा सॉफ्ट पॉवर असे म्हणतात. जे हार्ड पॉवर संकल्पनेच्या विरुद्ध आहे, ज्यात आपल्याला जे हवे आहे ते इतरांना करण्याचा आदेश दिला जातो.१द ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार सॉफ्ट पॉवर या वाक्यांशाचा अर्थ जबरदस्ती किंवा लष्करी सामर्थ्याऐवजी आर्थिक आणि सांस्कृतिक प्रभावातून(राष्ट्र, राज्य, युती, इ. ना ) प्राप्त होणारी शक्ती होय .

भारताचे महत्त्वाचे भू–राजकीय स्थान, प्राचीन सभ्यता आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा यामुळे ते आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये महत्त्वपूर्ण ऐतिहासिक आणि सांस्कृतिक शक्ती बनले आहे.व्यापार, तत्त्वज्ञान आणि वैज्ञानिक सिद्धींच्या दीर्घ इतिहासामुळे भारताचा जगभरात लक्षणीय प्रभाव पडला आहे.राजनैतिक संबंधांमधील त्याची सध्याची प्रमुखता त्याच्या आर्थिक सामर्थ्य, सांस्कृतिक विविधता आणि इतर अनेक क्षेत्रांमधील योगदान यांचे प्रतिबिंब आहे .

**अभ्यासाचा उद्देश**

१. सॉफ्ट पॉवर ची संकल्पना, भारताची त्या संबंधित धोरणे यांचा अभ्यास करणे.
२. सॉफ्ट पॉवर म्हणून भारताची परिणामकारकता, वाटचाल यांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

१. भारत एक सॉफ्ट पॉवर म्हणून जगाच्या पटलावर उदयास येत आहे.
२. भारतातील सामाजिक, सांस्कृतील वैविध्य, आर्थिक प्रगती भारताला सॉफ्ट पॉवर बनवण्यात महत्वाचे आहे.

**ऐतिहासिक संदर्भ**

भारताला तत्वज्ञानाची मोठी परंपरा लाभली आहे. यामध्ये न्याय , वैशेषिक , सांख्य , योग , पूर्व–मीमांसाव वेदांत तत्त्वज्ञानाच्या शाळा ही पारंपरिक (अस्तिक) प्रणाली आणि बौद्ध आणि जैन धर्म ही अपारंपरिक ( नास्तिक) प्रणाली यांचा समावेश होतो. यामध्ये धर्मविचार, नैतिकता, वास्तव, जगाची निर्मिती अशा अनेक संकल्पना आहेत. सर्व प्रकारच्या विचारांना सामावून घेणे , उदारपणा, तात्विक अधिष्ठान, बुद्धिप्रामाण्य इ. वैशिष्ट्यांमुळे भारतीय विचार जगाच्या विविध भागातील लोकांना आकर्षित करतात. कुंभमेळा, काशी, वाराणसी यांसारख्या अध्यात्मिक ठिकाणी विदेशी नागरिक मोठ्या संखेने हजेरी लावतात हे त्याचे उदाहरण म्हणावे लागेल.



Scanned with OKEN Scanner

बौद्ध धर्म भारताला दक्षिण आशिया तसेच इतरही काही देशासोबत जोडतो. भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी या विविध देशांना जेव्हा भेट देतात तेव्हा ते आवर्जून संबंधित दोन देशांना जोडणार्या धार्मिक,सांस्कृतिक बाबींचा उल्लेख करताना दिसतात. यामुळे दोन देशांतील नागरिकांना आपलेपणाची भावना निर्माण व्हायला मदत होते.

भारतीय इतिहासाची जगाला मिळालेली अजून एक देणगी म्हणजे 'योग' महर्षी पतंजली यांनी निर्मित योग म्हणजे आत्मा आणि परमात्मा यांचे एकीकरण होय. योग म्हणजे फक्त व्यायाम नसून एक जीवनशैली आहे. आज जगात २१ जून हा 'जागतिक योग दिवस' म्हणून साजरा केला जातो. २७ सप्टेंबर २०१४ ला भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेसमोर जागतिक योग दिवस साजरा करण्याची मागणी केली होती.[२] या मागणीस ११ डिसेंबर ला आमसभेने मान्यता दिली. आज भारत योग बाबतीत जगाला मार्गदर्शक ठरत आहे.

### आर्थिक प्रभाव

स्वातंत्र्यावेळी भारताची आर्थिकदृष्ट्या असलेली दरिद्री प्रतिमा आता पुसली गेली आहे . आज जागतिक आर्थिक पटलावर भारत एक आर्थिक दृष्ट्या प्रबळ देश म्हणून उदयास आलेला आहे . G-20 या आर्थिक दृष्ट्या प्रगत देशांच्या समूहाचा भारत हा एक महत्वपूर्ण सदस्य आहे .आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जीडीपी (क्रयशक्ती समता) आकडेवारीनुसार भारत जगात ३ र्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे.[३] भारताच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील मतांना यामुळे बळ मिळाले आहे. भारत सरकारच्या विदेश दौर्यामधील चमूत मोठया कंपन्यांच्या प्रतींनिधींचा समावेश होताना आपण पाहतो. यातील बर्याच कंपन्या फोर्ब्स च्या जगातील पहिल्या ५०० कंपन्यांच्या यादीत झळकतात. विविध देशांच्या भारतसोबतच्या संबंधांवर, निर्णयांवर याचा प्रभाव पडताना आपण पाहतो.

### शिक्षण व तंत्रज्ञानातील प्रगती

भारताने साक्षरतेमध्ये खूप प्रगती केली आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षण संस्था (IIT,IIMB.) ची स्थापना, कालानुरूप शैक्षणिक धोरण या सर्व बाबींमुळे परदेशी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भारतीय शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेत आहेत. तसेच भारतीय शिक्षित नागरिक मोठ्या संखेने विदेशात नोकरी , व्यवसाय करायला बाहेर पडत आहेत . यामुळे भारतीय मूल्ये जगभरात पसरली जात आहेत . विदेशातून भारतात पैसे पाठवायचे (remittance) प्रमाण ही वाढत आहे , या बाबतीत भारत जगात अव्वल आहे . अवकाश तंत्रज्ञानात इस्रो (भारतीय अवकाश संशोधन संस्था) ने मोठी मजल मारली आहे . चंद्राच्या अभ्यासासाठी भारताने चंद्रयान ३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवले, सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आदित्य एल-१ हा उपग्रह पाठवला आहे . एकाच वेळी जगभरातील विविध देशांचे १०० हून अधिक उपग्रह इस्रो ने अवकाशात प्रक्षेपित केले आहेत. यामुळे अवकाश तंत्रज्ञान, त्यातील व्यापार यामध्ये भारताने जगात छाप उमटवली आहे. भारताच्या परराष्ट्र संबंधांवर याचा सकारात्मक प्रभाव पाहायला मिळतो. भारताला एक सॉफ्ट पॉवर बनवण्यात ही बाब निश्चितच उपयोगी आहे.

### राजनैतिक संबंध

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात भारतीय सॉफ्ट पॉवर संकल्पनेची पुनर्रचना करण्यात आली. सामरिक अर्थाने वापरल्या जाणाऱ्या या मृदू शक्ती (सॉफ्ट पॉवर) चे पाच स्तंभ म्हणजे सन्मान, संवाद, समृद्धी (सामायिक समृद्धी), सुरक्षा (प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षा), आणि संस्कृती एवम् सभाता (सांस्कृतिक आणि सभ्यता संबंध).[४] परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांना पुढे नेण्यासाठीपूर्वीच्या भारतीय सरकारांनीसॉफ्ट पॉवरचे महत्त्व ओळखले होते, परंतु प्रयत्न मोठ्या प्रमाणात तदर्थ होते. परंतु मोदी सरकारच्या काळात यात एक एक धोरणात्मक दृष्टीकोन अवलंबला जात आहे .सांस्कृतिक राजनय , तंत्रज्ञानातील प्रगती, आर्थिक क्षेत्रातील प्रगती, विज्ञानातील प्रगती , शिक्षण क्षेत्रातील प्रगती या सर्व बाबींचा वापर भारत सरकार , नागरिक आपापल्या परीने देशाची जगातील प्रतिमा उंचावण्यासाठी, राजनैतिक संबंध सुधारण्यासाठी करत असतात . याच बरोबर विविध प्रादेशिक संघटना ( सार्क , बिमस्टेक इ.) ,जागतिक संघटना ( संयुक्त राष्ट्रे ,G-20, वर्ल्ड इकनॉमिक फोरम इ .) यांमधील भारताचा सक्रिय सहभाग , त्यांच्या निर्णय प्रक्रियेतील भारताची भूमिका , वाढते महत्व या सर्वांचा प्रभाव भारताच्या इतर देशांसोबत असलेल्या राजनयिकसंबंधांवर पडताना दिसतो. भारत संयुक्त राष्ट्र शांतता सेनेच्या कार्यात सतत सहभाग घेतो . या कार्यातून भारताची असलेली शांतता प्रेमी , सहकार्य प्रेमी अशी प्रतिमा दिसून येते. यामुळे जगात भारताची



Scanned with OKEN Scanner

चांगली, विश्वासाहार्य प्रतिमा निर्माण झाली आहे .

**सांस्कृतिक राजनय / मुत्सद्दीपणा**

सांस्कृतिक बंध हा संघर्ष टाळण्यासाठी आणि शांतता वाढवण्याचा एक मार्ग असू शकतो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जगातील विविध देशांना भेटी देतात तेंव्हा ते भारताच्या सॉफ्ट पॉवरचा प्रचार करतात. त्यात बॉलीवूड, सुफी संगीत आणि योग तसेच कला, वास्तुकला, पाककृती आणि लोकशाही मूल्यांमधील सामायिक वारसा यांचा समावेश असतो. मध्य आशिया सोबतच्या भारताच्या संबंधांवर बोलताना पंताप्रधान मोदी म्हणतात, भारत आणि मध्य आशियातील इस्लामिक वारसा इस्लामच्या सर्वोच्च आदर्शांद्वारे परिभाषित केला जातो - ते म्हणजे ज्ञान, धार्मिकता, करुणा आणि कल्याण. त्यांनी जगभरातील वाढत्या अतिरेकी घटनांशी एक फरक दर्शविला व भारत आणि मध्य आशियामधील आध्यात्मिक संबंध अधोरेखित केले. भारताच्या बहुसांस्कृतिक वारशावर जोर देऊन, मोदींनी हिंदू राष्ट्रवादी म्हणून त्यांच्या वैचारिक झुकावबद्दल प्रचलित टीका कमी केली.भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री सुषमा स्वराज या बँकॉक येथे जून २०२१ मध्ये झालेल्या संस्कृत परिषदेच्या प्रमुख वक्त्या होत्या. त्यांनी ६० राष्ट्रांतील ६०० हून अधिक तज्ञांशी संस्कृतमध्ये संभाषण केले आणि या भाषेचे वर्णन आधुनिक आणि सार्वत्रिक म्हणून केले. प्राचीन भाषेची समकालीन प्रासंगिकता अधोरेखित करताना, स्वराज यांनी असा युक्तिवाद केला की भाषेतील प्रवीणता ग्लोबल वॉर्मिंग, शाश्वत उपभोग, सभ्यता संघर्ष, गरिबी, दहशतवाद यांसारख्या समकालीन समस्यांवर उपाय शोधण्यात खूप पुढे जाऊ शकते.योग हे भारतातील सर्वात यशस्वी आणि लोकप्रिय सॉफ्ट-पॉवर साधन असू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संयुक्त राष्ट्र आमसभेतील प्रयत्नांमुळे २१ जून २०१५ पासून जगभरात २१ जून हा दिवस जागतिक योग दिवस म्हणून साजरा केला जातो . त्यांच्या मते योग ही भारताच्या प्राचीन परंपरेची अमूल्य देणगी आहे. आपली जीवनशैली बदलून आणि चेतना निर्माण करून, ते आपल्याला हवामान बदलाला सामोरे जाण्यास मदत करू शकते. या सर्व प्रयत्नांमुळे आज जगभरात शेकडो योग केंद्रे निर्माण केली गेली आहे . एक योग गुरु म्हणून भारताची जगत उच्च प्रतिमा निर्माण झाली आहे . भारतीय चित्रपट सृष्टी ( उदा . बॉलीवूड ) चे जगभरातील नागरिक चाहते आहेत . विविध चित्रपट, त्यांचे विषय, अभिनेत्यांची प्रतिमा यांच्यामुळे जगात भारताची योग्य प्रतिमा निर्माण व्हायला मदत होते.

भारतातील सांस्कृतिक मुत्सद्देगिरी आणि सॉफ्ट पॉवरचा पाठपुरावा परराष्ट्र मंत्रालया (MEA)च्या प्रतिष्ठित संस्थात्मक संरचनेद्वारे केला जातो, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (ICCR) ज्याची स्थापना १९५० मध्ये उर्वरित जगाशी भारताचे सांस्कृतिक संबंध पुनरुज्जीवित आणि मजबूत करण्याच्या उद्देशाने करण्यात आली होती. जगभरात भारतीय भाषांचा प्रसार व्हावा म्हणून सध्या भारत सरकार भाषेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या विद्वानांना २०,००० डॉलरचा आंतरराष्ट्रीय संस्कृत पुरस्कार देते. तसेच संस्कृत भाषा किंवा साहित्यात भारतात संशोधन करणाऱ्या परदेशी विद्वानांसाठी फेलोशिप आणि नवीन शिकणाऱ्यांना अभ्यासक्रम शिकण्याची संधी ही पुरवते.

**तुलनात्मक विश्लेषण, आव्हाने, भविष्यातील संभावना**

ब्रँड फायनान्सचा ग्लोबल सॉफ्ट पॉवर निर्देशांक २०२३ नुसार भारताची क्रमवारी २९ वरून सुधारून २८ झाली आहे . या क्रमवारीत अमेरिका (यूएसए) , यूनायटेड किंगडम, जर्मनी यांचा अनुक्रमे पहिलं दूसरा व तिसरा क्रमांक आहे. ब्रँड फायनान्सपरिचितता, प्रतिष्ठा आणि प्रभाव यांच्या सोबत आठ सॉफ्ट पॉवर श्रेणीं (संस्कृती आणि वारसा, आंतरराष्ट्रीय संबंध, शासन, व्यवसाय आणि व्यापार, मीडिया आणि दळणवळण, शिक्षण आणि विज्ञान, लोक आणि मूल्ये आणि टिकाऊपणा)च्या मूल्यांकनाच्या आधारे सॉफ्ट पॉवरच्या आधारावर राष्ट्रांची क्रमवारी लावते.[५] या क्रमवारीनुसार असे दिसत की, अलायन्स फ्रॅन्सेस (फ्रांस), ब्रिटीश कौन्सिल (यूनायटेड किंगडम) आणि कन्फ्यूशियस संस्थांच्या (चीन) तुलनेतसुमारे ३५ देशांमध्ये केंद्रे असलेल्या आणि भारतीय संस्कृतीला चालना देण्याचे उद्दिष्ट असलेल्याभारतीय सांस्कृतिक संबंध परिषदे (ICCR) ची कामगिरी अपुरी आहे. यामध्ये अजून बऱ्याच सुधारला वाव आहे . परंतु एक सकारात्मक बाब म्हणजे, कम्युनिकेशन्स अँड पब्लिक रिलेटन्स कन्सल्टन्सी पोर्टलँड म्हणते की भारत येत्या काही वर्षांत नक्कीच एक मोठा सॉफ्ट पॉवर प्लेअर म्हणून उदयास येईल .सॉफ्ट पॉवर च्या आठ श्रेणींचा एक सर्वांगीण दृष्टीकोण भारताला आगामी काळात अधिक फायदेशीर ठरू शकतो.



Scanned with OKEN Scanner

### निष्कर्ष

बदलत्या काळानुसार भारताने आपल्या सॉफ्ट पॉवर धोरणात सकारात्मक बदल केले आहे. भारत सरकार, मंत्रालये स्तरावर सॉफ्ट पॉवर च्या संबंधित विविध पैलूंवर भर दिला जात आहे. भारतीय कला, भाषा, शिक्षण, योग, जीवनपद्धती , सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक बाबी, प्राचीन विचार यांचा जगभरात प्रसार करण्यावर भर दिला जात आहे. शिक्षण , तंत्रज्ञान यामधील प्रगती जगभरातील नागरिकांना भारताकडे आकर्षित करत आहे . अवकाश तंत्रज्ञानात, त्याच्या व्यापारत भारत आज एक अग्रेसर देश आहे . एक योगगुरू म्हणून भारत जगाला योगाभ्यासात मार्गदर्शन करत आहे. भारतातील धार्मिक तत्त्वे, धर्मस्थळे, पर्यटन जगभरातील लोकांना भारताकडे खेचत आहेत. आर्थिक क्षेत्रातील प्रगतीमुळे जगाच्या अर्थपटलावर एक प्रबळ देश म्हणून भारताची प्रतिमा निर्माण झाली आहे. ब्रँड फायनॅन्स , पोर्टलँड सारख्या संस्थांनी प्रकाशित केलेल्या अहवालांनुसार सुधारलेली भारतची सॉफ्ट पॉवर क्रमवारी हेच दर्शवते की ,भारत एक सॉफ्ट पॉवर म्हणून जगाच्या पटलावर उदयास येत आहे आणि भारतातील सामाजिक, सांस्कृतील वैविध्य ,आर्थिक प्रगती भारताला सॉफ्ट पॉवर बनवण्यात महत्वाचे आहे.

### संदर्भ


१. Josephnyejr. 2004 book, Soft Power: The Means to Success in World Politics

२. The Times of India, 11 December 2014,UN declares June 21 as 'International Day of Yoga'.

३. International Monetary Fund,Retrieved11 -pril 2023,World Economic Outlook Database, October 2023 Edition. IMF.org. .

४. https://www.mea.gov.in

५. https://www.theaustraliatoday.com.au/india-jumps-while-australia-slips-one-spot-in-global-soft-power-2023-ranking/




Scanned with OKEN Scanner

• महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका •

International Innovative Journal Impact Factor ((IIJIF)
2.283




अथर्व पब्लिकेशन्स्

Visit us... www.atharvapublications.com

ISSN 2347-9639
9 772347 963003